# F.Y.B.Com

## MARATHI (मराठी )-II

भाषा आणि कौशल्य विकास (127B)

2019 Pattern) (CBCS) (Semester-II)

वेळ :२ :३० तास एकूण गुण : 70

सूचना : १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे .

२ ) उजवीकडील अंक प्रश्नाचे गुण दर्शवितात

---

प्रश्न १ ला अ ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा . [10]

i ) दि १२ जानेवारी २०२२ रोजीच्या दै सकाळ मधील जाहिरातीच्या आधारे टेल्को ( टाटा ) पुणे या कंपनीमधील व्यवस्थापक या पदासाठी नोकरीचा अर्ज लिहा

ii) तुमच्या परिसरामध्ये होणारी अस्वछता या संदर्भात मा मुख्याधिकारी नगरपालिका यांच्याकडे तक्रार करणारा तक्रार अर्ज लिहा .

आ ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा . [10]

i) तुमचा आई / वडील यांचे तब्येतीची चौकशी करणारे पत्र लिहा.

ii) ई-मेल म्हणजे काय? ई-मेल चे फायदे विशद करा .

प्रश्न २ रा अ ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा . [10]

i) वाणगंगा सहकारी पतसंस्था शिरूर जि पुणे यांच्या साचलक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि १५ डिसेंबर २०२२ रोजी संस्थेच्या सभागृहात सकाळी ११ वा संपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त लिहा .

ii) तुमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येत आहे त्या विषयीचे माहितीपत्रक तयार करा .

आ ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा . [10]

i) वीज चोरीला आळा बसावा यासाठी महावितरण कंपनीचे जाहीर निवेदन तयार करा .

ii) खालीलपैकी कोणत्याही दहा पारिभाषिक संज्ञा लिहा.

I) Link
II) Tax
III) Cheque
IV) Tender
V) Agenda
VI) Circular
VII) Bank
VIII) Flag
IX) Refund
X) Home
XI) Logo
XII) Key

P.T.O.

sppuquestionpapers.com

प्रश्न ३) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा . [15]

i ) खालील उताऱ्याचे एक तृतीयांश सारांशलेखन करून समर्पक शीर्षक द्या .

आनंद सगळ्यांनाच हवा असतो... पण आपलाआनंद नेमका कशात आहे, हे अनेकांना कळत नसतं. आनंद म्हणजे नेमकं काय हेही उलगडलेलं नसतं. कुठेअसतो हा आनंद? कुठे नसतो हा आनंद? आनंदी आनंदगडे, जिकडे तिकडे चोहीकडे! ही फक्त कविकल्पनाचनव्हे, तेच सत्य आहे, किंबहुना शाश्वत सत्य आहे!आनंदाची गंमत अशी आहे, की तुम्ही शोधू लागलात,की तो दडून बसतो, पकडू गेलात, की हातातून निसटतो.आनंदासाठी जितका आटापिटा कराल, तितका तोहुलकावण्या देतो. जितका सहजपणे घ्याल, तितका आनंदसहज प्राप्त होतो. आनंद असतोच. तो अनुभवता मात्र यावा लागतो.आनंदाच्या बाबतीत कळसा काखेत असूनही आपणगावाला वळसा घालीत असतो. आनंद आपण बाहेर शोधत असतो आणि तो मात्र आत असतो. आनंद आपल्यामनातच असतो. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्याअंतरंगातच असतो.हे खरं आहे, की आनंद सर्वत्र असतो; पण अंतरंगातआनंद असेल, तरच तो अनुभवता येतो. आनंदाचं नातं जुळतं, ते फक्त आनंदाशी. आनंदाला आकर्षित करतो, तोफक्त आनंदच. आनंदाला प्रसवतो, तोही आनंदच

ii) खालील इंगजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा

Discipline is a great quality. It is the first order of heaven. By the term, Discipline is meant according to rules. The rule is a standard laid down for guiding action, behavior, etc. The term Discipline, therefore, means that all our actions should be done perfect with certain principal or rules laid down for guiding us in the night path. It teaches us self-control and self-restrain. It produces a sense of duty. There is discipline in heavenly bodies-stars and planets. The ordered growth and decay (death) show that there is discipline everywhere in nature. Schools and colleges cannot run without discipline. Disciplines make us civilized. It teaches us respect for laws. Games and sports make the players disciplined. Discipline brings law and order. A well-disciplined person always done his work sincerely and honestly. If there is no discipline in the society people shall act as they please. Discipline keeps us within an order. We learn to respect the views and rights of others. Where there is no discipline, there is disorder. Without order and discipline, there can be no peace in society.

आ ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा . [15]

i) कोणत्याही एका नवीन मराठी चित्रपटाची दुरचित्रवाणीसाठी जाहिरात तयार करा .

ii) निसर्ग सहवास या नावाच्या नवीन गृहप्रकल्पाची वृत्तपत्रासाठी जाहिरात तयार करा .

*****

SPPUQuestionPapers.com